सं.फौ.अ.क्र.११७२/२०२५
आकाश चव्हाण वि. कैलास चव्हाण
नि. क्र. ०१ खाली

## पडताळणी फिर्यादी

मी शपथेवर निवेदन करतो की,

माझे नाव- आकाश सुभाष चव्हाण

माझे वय- ३०, व्यावसाय- शेती,

राहणार- अब्दुलापुर तांडा, ता. पैठण, जि.औरंगाबाद

उषा चव्हाण, सिंधू चव्हाण, पूजा राठोड, गेनाबाई चव्हाण, अर्जुन चव्हाण, कैलास चव्हाण, निखील चव्हाण, विजय राठोड व तुषार चव्हाण यांच्याविरोधात मी तक्रार दाखल केली आहे. दि.३१.०५.२०२५ आम्ही शेतात काम करत होतो. तेव्हा आरोपी क्र. १ ट्रॅक्टर घेवुन नांगरणीसाठी आमचे शेत गट क्र.११० मधील ९१ आर मध्ये आले. मी आरोपीला सांगितले की, तुम्ही नांगरू नका हे आमचे शेत आहे. तेव्हा आरोपींनी मला शिवीगाळ केली. अरे "मादरचोद माजला का हरामखोर" तेव्हा बाकीचे सर्व आरोपी तेथे आले व त्यांनी मला धरले व म्हणाले की, "तू ट्रॅक्टरसमोर आला तर तूला मारुन टाकेल" असे म्हणाले. त्यानंतर त्यांनी मला खाली पाडून लाथा बुक्याने मारहाण केली. आमचे शेत प्रभू चव्हाण यांच्याकडुन खरेदी केले होते. भांडण सोडवण्यासाठी मिराबाई चव्हाण व सुभाष चव्हाण माझे आई वडील आहे. त्यानंतर गणेश चव्हाण व सुभाष चव्हाण यांनी भांडण सोडवले. तसेच जिवे मारण्याची धमकी दिली. त्यानंतर भांडण सोडवुन आम्ही पाचोड पोलीस स्टेशनला गेलो. तेथे पोलीसांनी आरोपी क्र.२ ते ९ चे नावे एनसी मध्ये घेतले नाही. त्यानंतर आम्ही वारंवार पोलीस स्टेशनला गेलो परंतू त्यांनी आरोपींचे नाव घेतले नाही व काही एक कार्यवाही केली नाही. त्यानंतर न्यायालयात आरोपींविरुध्द तक्रार केली. तरी वरील सर्व आरोपींविरुध्द माझी कायदेशीर तक्रार असुन त्यास कडक शासन व्हावे. यापेक्षा अधिक माझे सांगणे नाही.

फिर्यादीची सही

दि.२४.०९.२०२५

समक्ष
24.9.25
(श्रीमती एस.एस.रामदिन)
प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी,
पैठण